**CNR No :- MHSI100000662024**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. १४/२०२४ :–

## –: निशाणी १२ वरील आदेश :–

प्रतिवादी क्र.१, २, ४, ५, ७, ८, ११ व १३ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्याच्या विरुद्ध पारीत झालेला ''कैफियत नाही'' चा आदेश रद्दबातल होऊन मिळण्यासाठी केला आहे.

०२. प्रतिवादी क्र.१, २, ४, ५, ७, ८, ११ व १३ चे म्हणणेनुसार, सदरहु वादी तर्फे दाखल दाव्याच्या गुणदोषावर कैफियत मागिल तारखेस दयावयाची होती. परंतु, आवश्यक ती माहीती व कागदपत्रे वेळीच उपलब्ध न झाल्याने दाव्यावर कैफियत देणे अडचणीचे झालेले होते, त्यामुळे मागिल तारखेस दाव्याच्या गुणदोषावर कैफियत देणे प्रतिवादींस शकय झाले नाही परीणामी त्यांच्या विरदध "कैफियत नाही" असा आदेश झालेला आहे. प्रतिवादींची कैफियत मुदतीमध्ये दाखल न करण्यामागे कोणताही गैरहेतु नव्हता. वादीच्या दाव्यावर प्रतिवादींची कैफियत दाखल न झाल्यास सदर दाव्याचे गुणदोषावर निर्णय होण्यास अडचण निर्माण होणारी असुन, प्रतिवादीं यांचेवर अन्याय होणारा आहे. सबब, प्रतिवादीं विरुद्ध पारीत ''कैफियत नाही'' चा आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी वादीतर्फे म्हणणे मागविण्यात आले. वादी यांनी नि.क्र.१३ वर प्रस्तुत अर्जाकामी म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुरीस विरोध दर्शविलेला आहे. वादींच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादीतर्फे दाखल नि. १२ चा अर्ज हा खोटा व

खोडसाळ असून कायद्यातील अनिवार्य तरतुदीस धरुन नसल्याने तसेच अर्जात नमूद केलेले कारण विश्वासार्ह नसल्याने अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादीस दाव्याच्या गुणदोषावर कैफियत दाखल करण्याची उचित संधी उपलब्ध करुन देऊनही त्यांनी त्यांची कैफियत विहीत मुदतीत दाखल न केल्याने त्यांच्या विरुद्ध दि.२५.०९.२०२४ रोजी कैफियत नाहीचा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी यांनी अर्जामध्ये नमुद केलेले कारण हे संयुक्तीक असल्याचे दिसुन येत नाही. न्यायालयाचा व परीणामी वादीचा अमुल्य वेळ प्रतिवादीच्या या कृत्यामुळे वाया गेलेला आहे. परंतु, केवळ विलंब झाला म्हणुन प्रतिवादी यांना त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी नाकारणे हे नैसर्गीक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. प्रतिवादींना त्यांची कैफियत सादर करण्याची उचित संधी नाकारल्यास त्यांच्या न्यायहक्कांवर गदा येणारी आहे. प्रतिवादींनी सादर केलेल्या कैफियतीद्वारे दावा गुणदोषावर निकाली करणेस न्यायालयास मदतच होणारी आहे. केवळ या कारणास्तव प्रतिवादींनी केलेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करुन अर्ज मंजूर करणे न्यायोचीत राहील. या सर्व कारणांचा साकल्याने विचार करता, मी खालीलप्रमाणे पारीत करीत आहे :-

**-:: <u>आदेश</u> ::-**

१. रक्कम रु.४००/-(रुपये चारशे मात्र) खर्चाचे आदेश करुन नि.क्र.१२ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. सदर खर्चाची रक्कम रु.४००/-(रुपये चारशे मात्र) प्रतिवादी क्र.१, २, ४, ५, ७, ८, ११ व १३ यांनी एकत्रीतरीत्या वादीस आदा केल्यावर त्यांच्या विरुद्ध पारीत झालेला दि.२५.०९.२०२४ रोजीचा ''कैफियत नाही'' चा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र. १, २, ४, ५, ७, ८, ११ व १३ यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत आदेशाची पुर्तता न केल्यास, सदरचा आदेश स्वयंचलनाने रद्द झाला असे समजण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदीत व उद्घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
YASHODHAN
PRADEEP BAVKAR
Date: 2025.09.03
12:59:11 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)
दिनांक – ०३.०९.२०२५. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)दोडामार्ग.